महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १९ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## कल्याण डोंबिवलीचे रूप आता स्वच्छतेच्या माध्यमातून बदलेल! - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** आपले शहर स्वच्छ आणि सुंदर असावं असं कल्याण डोंबिवलीकरांचे स्वप्न आहे आणि स्वच्छतेच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमामुळे कल्याण डोंबिवलीचे रूप, स्वच्छतेच्या माध्यमातून बदलेल असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा एकनाथ शिंदे यांनी आज केले. डोंबिवलीतील सावळाराम क्रीडा संकुलात विविध उपक्रमांचे लोकार्पण व भूमिपूजन मा. ना. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले, यावेळी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. पंतप्रधान मोदींनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले, मीही मुख्यमंत्री असताना डीप क्लीन ड्राईव्ह उपक्रम सुरू केला, "स्वच्छता असे जिथे- आरोग्य वसे तिथे" हे वाक्य उधृत करून त्यांनी या स्वच्छता उपक्रमास शुभेच्छा दिल्या.आज लोकार्पण झालेले सगळे प्रकल्प लोकाभिमुख आहेत अशा शब्दात आयुक्तांची प्रशंसा करीत विकासाला पैसे कमी पडणार नाहीत अशी ग्वाही मा. उप मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.वेगवेगळ्या प्रकल्पांचे विशेषत: स्वच्छता उपक्रमाचे आज लोकार्पण होत आहे शहरातील नागरिकांनी देखील स्वच्छतेचे पालन करावे असे आवाहन आमदार रवींद्र चव्हाण यांनी यावेळी बोलताना केले. कल्याण डोंबिवलीच्या वाढत्या लोकसंख्येला सक्षम प्रणालीची गरज होती त्यामुळे घनकचऱ्याचा हा नवीन उपक्रम उभा राहत आहे, या उपक्रमांमध्ये महापालिकेतील कामगारांना देखील समाविष्ट करून त्यांना रोजगार द्यावा असा सूचना खासदार श्रीकांत शिंदे यांनी यावेळी संबधितांना दिल्या .कल्याण परिक्षेत्रात मोठे प्रकल्प उभे



राहण्यासाठी शासनाने नेहमी सहकार्य केले सावळाराम क्रीडा संकुलात देखील आता एलिवेटेड स्टेडियम होईल अशी माहिती खासदार डॉक्टर शिंदे यांनी आपल्या भाषणात दिली.

आज लोकार्पण होणाऱ्या उपक्रमांची माहिती नेटक्या शब्दात विशद करून कल्याण डोंबिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका कटिबद्ध असून आपल्या सर्व नागरिकांचे सहकार्य देखील तितकेच मोलाचे आहे असे उद्गार महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आपल्या प्रास्ताविकात काढले.आजच्या कार्यक्रमात कचरा संकलन ,वाहतूक आणि रस्ते स्वच्छता प्रकल्पाचा शुभारंभ, परिवहन उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना धनादेश वाटप , रिंग रोड मधील बाधित लाभार्थ्यांना पुनर्वसन धोरणानुसार सदनिकांचे वितरण,MUTP प्रकल्पातील बाधितांना चाव्यांचे वितरण, टिटवाळा पूर्व येथील जागेवर उभारलेल्या सौर ऊर्जेवर आधारित उद्यानाचे ऑनलाईन लोकार्पण, खंबालपाडा क्रिडा संकुलाचे ऑनलाइन भूमिपूजन, परिमंडळ तीन मधील दामिनी पथकासाठी वाहनांचे हस्तांतरण इ कार्यक्रम संपन्न झाले. कार्यक्रमा अखेरीस उपस्थित मान्यवरांनी स्वच्छता उपक्रमाच्या वाहनांना ध्वजांकन केले.या समयी परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार रवींद्र चव्हाण, सुलभाताई गायकवाड, राजेश मोरे, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, परिमंडळ- ३ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, इतर पदाधिकारी, माजी पालिका सदस्य महापालिका अधिकारी ,मान्यवर व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

**मुख्य कार्यक्रम:**

१) कचरा संकलन वाहतूक, रस्ते सफाई व शहर स्वच्छता प्रकल्पाचा शुभारंभ.
२) परिवहन उपक्रमाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेचे धनादेश वाटप.
३) कल्याण - टिटवाळा रिंग रोड मधील पात्र लाभार्थ्यांना सदनिका वाटप.
४) MUTP-3A कल्याण बदलापूर ३ री व ४ थी रेल्वे मार्गिका बाधित प्रकल्पग्रस्तांना सदनिका वाटप.
५) MUTP-3A कल्याण गुड्स यार्ड उपमध्य रेल्वे प्रकल्पात बाधितांना सदनिका वाटप.
६) टिटवाळा येथील उद्यानाचे ऑनलाईन लोकार्पण.
७) खंबाळपाडा येथे अद्ययावत क्रिडा संकुलाचे ऑनलाईन भूमीपूजन.
८) महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दामिनी पथकाला १६ दुचाकी वाहनांचे हस्तांतरण.

## दाखल्यांच्या शुल्कवाढीचा विद्यार्थ्यांना फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ■ भरत उबाळे

यंदाचे शैक्षणिक सत्र काही दिवसांतच सुरू होणार आहे. त्याकरिता लागणारे दाखले आणि प्रमाणपत्रांसाठी पालक तसेच विद्यार्थ्यांची लगबग सुरू आहे. दरम्यान, ऐन शैक्षणिक सत्राच्या तोंडावर आपले सरकार सेवा केंद्रांमधून दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांच्या शुल्कात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधीच शुल्कवाढ केल्याने याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिक, विशेषत: विद्यार्थी आणि पालकांना बसत आहे.

२५ एप्रिलपासून हे नवीन दर लागू झाले असून, जात व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी ५७ ऐवजी १२८ रुपये, तर रहिवासी, उत्पन्न व इतर प्रमाणपत्रांसाठी ३३ ऐवजी ६९ रुपये आकारले जात आहेत.

दहावी आणि बारावीचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. त्यामुळे महाविद्यालयीन प्रवेशासाठी लागणारी प्रमाणपत्रे घेण्यासाठी विद्यार्थी आणि पालक आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये गर्दी करीत आहेत. दरम्यान, शुल्कवाढीमुळे त्यांच्यावर आर्थिक भार वाढला आहे. ही वाढ शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला झाल्याने पालकांमध्ये नाराजी पसरली आहे. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्यांना प्रवास, प्रतिज्ञापत्रांची खर्चिक प्रक्रिया आणि आता वाढलेले शुल्क असा दुप्पट खर्च करावा लागत आहे.

२००८ मध्ये एक प्रमाणपत्र घेण्यासाठी फक्त २० रुपये शुल्क खर्च होता. संगणक व प्रिंटर देखभाल, वीज, भाडे यांसारख्या वाढत्या खर्चाचा हवाला देत २०१८ मध्ये दरवाढीचा निर्णय झाला. त्यानंतर आता साडेसहा वर्षांनी एकदम दुप्पट दरवाढ केली आहे. नागरिकांना घरबसल्याही प्रमाणपत्र काढण्यासाठी अर्ज करता येऊ शकतो.

शहापूर हा आदिवासीबहुल तालुका असल्याने दऱ्याखोऱ्या आणि जंगल परिसरामुळे येथे मोबाईल नेटवर्कची दररोजच बोंब असते. अनेकांजवळ स्मार्टफोन नसल्यानेदेखील समस्या निर्माण होत असल्याने घरून अर्ज करण्याची प्रक्रिया क्लिष्ट बनत आहे. त्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रातच येऊन अर्ज करावे लागत आहेत. त्यातच दरवाढ झाल्याने याचा भुर्दंड विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना सहन करावा लागत आहे.

**शासनाकडून दर निश्चित करण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासन करते. शासनाने ठरवलेल्या दरापेक्षा कुणी अतिरिक्त शुल्क वसूल करीत असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.**

**- अमित सानप, प्रांताधिकारी**




**प्रमाणपत्रांचे जुने व नवीन शुल्क**

| प्रमाणपत्र | जुने शुल्क | नवे शुल्क |
|---|---|---|
| जात प्रमाणपत्र | ५७.२० | १२८ |
| नॉन क्रिमीलेअर | ५७.२० | १२८ |
| रहिवासी प्रमाणपत्र | ३३.६० | ६९ |
| राष्ट्रीयत्व | ३३.६० | ६९ |
| एसईबीसी | ३३.६० | ६९ |
| उत्पन्न प्रमाणपत्र / राष्ट्रीयत्व | ३३.६० | ६९ |




## भाजपा- महायुतीच्या वतीने मुरबाडमध्ये तिरंगा रॅली



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड - दिलीप पवार

सध्या सुरु असलेल्या भारत पाकिस्तान तणावा संदर्भात तसेच काश्मीर मधील पहेलगाम येथे भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा बदला भारतीय सैनिकांनी जशाच तसे उत्तर देऊन घेतल्या बद्दल भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी तसेच अभिनंदन करण्यासाठी देशभर तिरंगा रॅलीचे आयोजन केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सैनिकांना फ्री हॅन्ड सवलत दिल्याने सैनिकांनी केवळ साडे तीन दिवसात पाकिस्तानला धडा शिकवला आहे. सैनिकांच्या कामगिरीचा सन्मान होण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.मुरबाड मध्येही भारतीय जनता पार्टी , शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मुरबाड शहराच्या तिन हात नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रॅली काढण्यात येऊन विसर्जित करण्यात आली.यावेळी रॅलीत उपस्थित कार्यकर्ते जोरदार घोषणाबाजी करत देशाप्रती प्रेम व आपल्या सैनिकांना पाठिंबा देत होते.या रॅलीत सध्या भारतीय सेनेत काश्मीर येथे देशसेवा करत असलेला रायते येथिल योगेश घावट हा फौजी उपस्थित राहून त्याने रॅलीचा उत्साह वाढविला. रॅलीत मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, भाजपा नेते भरत पाटील, राजेश पाटील, शिंदे गटाचे मुरबाड तालुका अध्यक्ष कांतीलाल कंटे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष चंद्रकांत बोस्टे, मंडळ तालुका अध्यक्ष दिपक पवार, जितेंद्र भावार्थे, प्रतिक हिंदुराव, दिनेश उघडे, नितीन मोहपे,भाई तेलवणे, सुरेश बांगर, मोहन सासे यांच्यासह मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते , महिला कार्यकर्त्या, नगरसेवक, नगरसेविका , मा. पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व देशप्रेमी नागरिक सहभागी झाले होते.

## संसदेत महाराष्ट्राची बाजी
## राज्यातील सात खासदारांना संसदरत्न पुरस्कार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली :** देशातील 17 खासदारांना यंदाचा 'संसदरत्न पुरस्कार 2025' जाहीर करण्यात आलाआहे.यंदा संसदरत्न पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे यांच्यासह 7 खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे. संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी 'प्राइम पॉइंट फाउंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. संसदेत प्रश्न विचारणे, वादविवादात सहभाग, कायदेविषयक कामात योगदान आणि समित्यांमधील कार्य या विविध निकषांवर आधारित विशेष मूल्यांकनानंतर ही निवड केली जाते. या पुरस्कारांची निवड राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखालील ज्युरी समितीने केली आहे.

महाराष्ट्रातील खासदार सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना - शिंदे गट), अरविंद सावंत (शिवसेना - उद्धव ठाकरे गट), नरेश म्हस्के (शिवसेना - शिंदे गट), स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप) आणि वर्षा गायकवाड (काँग्रेस) या 7 खासदारांचा संसदेत उत्कृष्ट कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्कारासाठी गौरव करण्यात येणार आहे. यावर्षी 4 खासदारांना त्यांच्या दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण योगदानासाठी विशेष संसदरत्न सन्मान देण्यात येणार आहे. प्राइम पॉइंट फाउंडेशन'ने दिलेल्या निवेदनानुसार, भर्तृहरि महताब, सुप्रिया सुळे, एन. के. प्रेमचंद्रन आणि श्रीरंग बारणे हे चार खासदार 16वी आणि 17वी लोकसभेत सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणारे खासदार ठरले असून सध्याच्या कार्यकाळातही ते तितक्याच सक्रियतेने कार्यरत आहेत.

## भिवंडी मनपाच्या आरोग्य विभागात ढिसाळ कारभार

### प्रशासकीय कामकाजात राजकीय हस्तक्षेप?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी, ता.१८ (बातमीदार): महानगरपालिकेच्या आरोग्य विभागावर वरिष्ठांचे नियंत्रण ढासळल्याने विभागात काम करणाऱ्यांचा बेफिकीरपणा वाढला आहे. कचरा ठेका संपुष्टात आल्यानंतरही ठेकेदारास पालिकेने दिलेली वाहने अधिकाऱ्यांनी परत घेतलेली नाही. परिणामी दिलेल्या वाहनापैकी एक वाहन सार्वजनिक रस्त्यांवर जाळून खाक झाले आहे. त्याबाबत आरोग्य अधिकाऱ्यांनी कानावर हात ठेवले असून याप्रकरणी पोलिसात तक्रार न केल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

भिवंडी पालिकेने नागरिकांकडून ओला-सुका कचरा उचलण्यासाठी आणि त्या कचऱ्याचे डंपिंग ग्राउंडवर विघटन करून विल्हेवाट लावण्यासाठी ठेका आर अँड बी इन्फ्रा या कंपनीस दिला होता. त्यासाठी पंतप्रधान स्वच्छता अभियानांतर्गत कोट्यवधी खर्चुन महापालिकेला मिळालेली ५० इंजिन वाहने, २३ आरसी मशीन, डंपर, ट्रक इत्यादी वस्तूही पालिकेने कंपनीला दरमहा फक्त १ रुपयांना दिली होती. हा कचरा संकलनाचा करार रद्द करून सुमारे १० महिने उलटूनही आरोग्य विभागाने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेकेदाराकडून वाहने परत घेतली नाही. अथवा ठेकेदारावर कोणतीही कारवाई केलेली नाही. याबाबत पालिकेचे अधिकारी स्पष्टपणे कोणतीही माहिती न देता आपले फोन बंद करीत आहे. सूत्रांकडून अशी माहिती मिळते कि, महानगरपालिकेत सध्या प्रशासकीय कारभार सुरू असल्याचे दिसत असले तरी पडद्यामागे राजकीय हस्तकांची आणि माजी नगरसेवकांची अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर मेहेरनजर आहे. काही अधिकारी तर माजी नगरसेवकांच्या मर्जीनेच काम करतात, असे आढळून येत आहे.

ढिसाळ कारभारामुळे ठेकेदाराकडे पालिकेची वाहने बेवारस स्थितीत खाजगी व सार्वजनिक जागेत ठेवलेली आढळून येतात. त्यापैकी ओला व सुका कचरा जमा करणारी घंटागाडी वाहन (क्र. एम एच ०४/ के एफ ४२०४) ही नागरिकांना मिल्लत नगर भागात जळत्या स्थितीत आढळून आली. याबाबत नागरिकांनी पालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना माहिती देऊनही त्यांनी कोणतीही फौजदारी कारवाई करण्याचे धाडस केले नाही. या घटनेची पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी गंभीर दाखल घेऊन पालिकेचा आरोग्य विभाग सध्या कोणाच्या दहशतीखाली काम करीत आहे, याची शहानिशा करावी आणि संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शहरातील नागरिक करत आहेत.

## पालघरमध्ये गॅस गळती
## दहा कामगारांची प्रकृती बिघडली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर जिल्ह्यातल्या बोईसरमधील एका रासायनिक कारखान्यामध्ये निष्काळजीमुळे गॅस गळती झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दहा पेक्षा अधिक कामगारांची प्रकृती बिघडली आहे. ही दुर्दैवी घटना बोईसच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये घडली आहे. विशेष म्हणजे जेव्हा गॅस गळतीमुळे कामगारांची प्रकृती बिघडल्याचं लक्षात आलं तेव्हा या रासायनिक कारखान्याच्या मॅनेजरनं ही घटना दाबवण्याचा प्रयत्न केला असा आरोप होत आहे. या घटनेनंतर कारखान्याच्या व्यवस्थापकानं सर्व मजुरांना दुसऱ्या ठिकाणी हलवलं. मात्र



जेव्हा कामगारांना तीव्र वेदना होऊ लागल्या, डोळ्यांमध्ये आणि नाकामध्ये तीव्र जळजळ जाणवू लागली, त्यांची प्रकृती खालावली तेव्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाची पाहाणी केली. प्रकृती खालवल्यानंतर केलं रुग्णालयात दाखल मिळालेल्या माहितीनुसार हा गॅस इतका विषारी होता की, या गॅसच्या संपर्कात जे मजूर आले, त्यांना तीव्र वेदना होऊ लागल्या, त्यांच्या डोळ्यात आणि नाकात तीव्र जळजळ होऊ लागली, त्यांची प्रकृती खालावली, ते जोरजोरात ओरडून लागले. सुरुवातीला या कारखान्याच्या व्यवस्थापकानं हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र कामगारांची प्रकृती बिघडल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानं हे प्रकरण समोर आलं आहे. धक्कादायक बाब म्हणजे कोणतीही सुरक्षिततेची काळजी न घेता या कारखान्यामध्ये धोकादायक केमिकलचं उत्पादन सुरू होतं. यामुळे पुन्हा एकदा कामगारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. सध्या या कामगारांची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन, घटनास्थळाची पाहाणी केली. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. यामुळे कामगारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. कोणतीही सुरक्षेची काळजी घेण्यात आली नव्हती अशी माहिती समोर येत आहे.

## भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ खडवलीत तिरंगा रॅलीचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ऑपरेशन सिंदुर सैन्य दलाने यशस्वी केल्याने त्यांच्या शौर्य प्रति आभार व्यक्त करण्यासाठी तसेच पराक्रमाची साक्ष जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन भाजप कल्याण ग्रामीण यांच्या वतीने खडवली येथे करण्यात आले होते,खडवली पश्चिम भाजप जनसंपर्क कायौलया पासुन तिरंगा यात्रा काढण्यात आली खडवली पश्चिम बाजारपेठ येथून सुरुवात करण्यात आली, तिरंगा यात्रेत भारताचे तिंरगा झेंडा व सैनिकाचे फलक दिसत होते व जोरदार घोषणा दिल्या,त्या नंतर भाजप कायौलयात पदग्रहण सोहळा व सत्कार सोहळा






कायैक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचे पुजन करून कायैक्रमाची सुरुवात करण्यात आली, पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून आलेले आमदार किसन कथोरे याचा कल्याण तालुका ग्रामीण भागाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले,

तसेच नवनिर्वाचित ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र ढाकी यांचा सन्मान सोहळा व कल्याण तालुका ग्रामीण अध्यक्ष शेखर लोणे याचा पदग्रहण सोहळा करण्यात आला,यावेळी आमदार किसन कथोरे, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र ढाकी,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रवींद्र घोडविंदे,योगेश धुमाळ, प्रकाश भोईर, कल्याण तालुका अध्यक्ष शेखर लोणे, जिल्हा उपाध्यक्ष राजाराम चौधरी, मुरली चौधरी,अशोक भोईर, चिंतामण मगर, युवा अध्यक्ष देवीदास चौधरी, मगेश शेलार, संजय शेलार,विवेक त्रिवेदी,यांच्या सह आदि उपस्थित होते.









## वाचक मनोगत

### मुलांनो पुन्हा मैदानात या......



आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्टया लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**श्याम ठाणेदार - दौंड**

# एक देश एक निवडणूकीमुळे ९०% मतदानासह साडेचार लाख कोटींची बचत - संसदीय समितीचा अंदाज

**'एक देश, एक निवडणूक' झाल्यास एकूण साडेचार लाख कोटी रुपयांची बचत होईल आणि मतदानाचा टक्का 80 ते 90 टक्केपर्यंत जाईल, असा अंदाज या संबंधीच्या संसदीय समितीने व्यक्त केला आहे. समितीचे अध्यक्ष खा. पी. पी. चौधरी यांनी शनिवारी मुंबईत आयोजित पत्र परिषदेत ही माहिती दिली. महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेल्या या समितीने विविध राजकीय पक्ष, वित्तीय संस्था आणि राज्य सरकारचे ज्येष्ठ अधिकारी यांच्याशी दिवसभर चर्चा केली. सायंकाळी खा. चौधरी यांनी पत्र परिषदेत सांगितले, की साडेचार लाख कोटी रुपये केवळ देशाचेच वाचतील, असे नाही. सकल घरेलू उत्पादनाच्या 1.6 टक्के म्हणजे 4 लाख 50 हजार कोटींचीबचत होईल, असा अंदाज आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विधानसभा आणि लोकसभा निवडणुका वेगवेगळ्या होतात, या निवडणुकांमध्ये आर्थिक व्यवहार ठप्प होतात आणि देशाच्या १.६ टक्के 'सकल राष्ट्रीय उत्पादना'स (जीडीपी) त्याचा फटका बसतो. देशातील सर्व निवडणुका एकाच वेळी झाल्या तर सकल राष्ट्रीय उत्पादन साडेचार लाख कोटी रुपयांनी वाढेल, असा दावा 'एक देश एक निवडणूक' संदर्भात नेमलेल्या संसदेच्या संयुक्त समितीच्या अध्यक्षांनी शनिवारी केला.

समितीने आपल्या मुंबई दौऱ्यात महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, रिझर्व बँक ऑफ इंडियासह विविध बँका व विमा कंपन्यांशी विस्तृत सल्लामसलत केली. या चर्चेनंतर एक देश एक निवडणुक (समांतर) संदर्भात समिती अध्यक्ष खासदार पी. पी. चौधरी, खासदार धर्मेंद्र यादव व घनश्याम तिवारी



यांनी माध्यमांशी संवाद साधला.स्वातंत्र्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या होत्या. परंतु १९६८ आणि १९६९ मध्ये अनेक विधानसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्या. त्यानंतर डिसेंबर १९७० मध्ये लोकसभाही विसर्जित करण्यात आली. त्यामुळे एक देश, एक निवडणुकीची परंपरा खंडित झाली.

आज आम्ही एक देश एक निवडणुकीसंदर्भात आर्थिक संस्थांशी चर्चा केली. या संस्थांनी लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहितांमुळे कर्ज मंजुरी, वितरण तसेच आर्थिक व्यवहारांना कसा फटका बसतो याची माहिती दिली. सर्व निवडणुका एकाच वेळी झाल्या तर देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात १.६ टक्क्यांनी भर पडेल, असा अंदाज बँकांनी व्यक्त केल्याची माहिती चौधरी यांनी दिली. या निवडणुका एकाच दिवशी होणार नाहीत. एक देश एक निवडणूक म्हणजे निश्चित केलेल्या कालावधीपूर्वी निवडणुका घेणे होय. काही विधानसभा भंग झाल्या, राष्ट्रपती राजवट लागू झाली तरी उर्वरित काळासाठी निवडणुका होऊ शकतात. हा निवडणूक सुधारणा कार्यक्रम आहे. आर्थिक संस्थांनी याचे लाभ आणि नुकसान याची माहिती दिल्यानंतर एक देश एक निवडणूक संदर्भात संसदेला समिती शिफारशी करेल. या बैठकीला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, भाजपचे संबित पात्रा, शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे, आदी २९ सदस्य उपस्थित होते.

समितीने स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक, युनियन बँक, एलआयसी, जीआयसी आणि नाबार्डसह बँकिंग व विमा क्षेत्रातील प्रमुख संस्थांच्या प्रतिनिधींशी समितीने चर्चा केली. त्यांनी सांगितले की, एकत्रिक निवडणुकांचा बँकिंग संस्कृतीवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी 'इंडियन बँक्स असोसिएशन'च्या माध्यमातून सर्वसमावेशक अभ्यास करण्यात येईल आणि त्याचे निष्कर्ष समितीला सादर करण्यात येतील.

एकाच वेळी निवडणुका झाली तर देशाचे ४ लाख ५० हजार कोटी रुपये वाचतील असे तुम्ही म्हणता. पण, बड्या कर्जदारांचे तुम्ही १२ लाख ५० कोटी रुपये कर्ज माफ केले, त्याचे काय? त्यावेळी तुम्हाला सरकारी पैशाचे काहीच कसे वाटले नाही. निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे एकाच वेळी निवडणुकांमुळे 'जीडीपी' वाढीचे कारण दाखवता येणार नाही, असा सवाल समाजवादी पक्षाचे खासदार धर्मेंद्र यादव यांनी बँकांच्या वरिष्ठांना केला.

**'केंद्राच्या हाती अमर्याद अधिकार'**

लोकसभा दीड वर्षाचा कालखंड बाकी असताना भंग झाली तर देशातील सर्व राज्यांच्या निवडणुका लोकसभा निवडणुकांबरोबर घ्याव्या लागणार आहेत. यामुळे विधानसभांवर अन्याय होईल. 'एक देश एक निवडणूक' विधेयक लोकसभा केंद्रीत आहे. या विधेयकामुळे केंद्राच्या हाती अधिकाराचे अमर्याद केंद्रीकरण होणार आहे, असा मुद्दा राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी समितीसमोर मांडला.

## रक्ताच्या कर्करोगाचं वेळेवर निदान महत्त्वाचं

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : रक्ताचा कर्करोग म्हणजे ल्युकेमिया, लिम्फोमा आणि मल्टिपल मायलोमा यासारखे आजार. हे आजार रक्त, बोन मॅरो (अस्थिमज्जा) आणि लिम्फॅटिक सिस्टिमवर परिणाम करतात. जरी उपचार पद्धतींमध्ये मोठी प्रगती झाली असली, तरी या कर्करोगांचं लवकरात लवकर निदान होणं हे अजूनही रुग्णाच्या चांगल्या उपचार परिणामासाठी आणि जीवनमानासाठी खूप महत्त्वाचं आहे. या कर्करोगावर HCG कॅन्सर सेंटरच्या सल्लागार डॉ. अदिती शाह कासकर यांनी माहिती दिली. त्यांच्या मते, या प्रकारच्या कर्करोगांची खास गोष्ट म्हणजे अनेक वेळा हे सुरुवातीला कोणतेही ठोस लक्षण न देता विकसित होतात. थकवा, वारंवार इन्फेक्शन होणं, ताप, रात्री घाम येणं, सहजपणे फोड येणं किंवा लिंफ नोड्स सुजणं ही लक्षणं अगदी सामान्य वाटू शकतात. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष होऊन निदान उशीराने होतं. जेवढ्या लवकर रक्ताचा कर्करोग ओळखला जातो, तेवढा तो उपचारांना चांगला प्रतिसाद देतो. सुरुवातीच्या टप्प्यात निदान झालेल्या रुग्णांना कमी तीव्रतेचे उपचार लागतात, गुंतागुंत कमी होते आणि त्यांचे जगण्याचे प्रमाण अधिक असते.

नेहमीच्या रक्त तपासण्या, सतत जाणवत असलेली लक्षणं आणि वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणं या गोष्टी वेळेवर निदानासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. कधी कधी फक्त रक्तातील घटक असामान्य असणं किंवा काही लक्षणं दीर्घकाळ टिकणं हाच एकमेव संकेत असतो. त्यामुळे डॉक्टरांनी आणि रुग्णांनीही सतर्क राहणं आवश्यक आहे. विशेषतः ज्यांना हा धोका अधिक आहे अशा गटाच्या लोकांनी सजग राहणे आवश्यक आहे. बऱ्याचदा विचारला जाणारा प्रश्न म्हणजे रक्ताचा कर्करोग आनुवंशिक असतो का? बहुतांश केसेसमध्ये हा आजार अचानक होतो, पण काही प्रकारांमध्ये कुटुंबात त्याचा संबंध दिसून येतो. उदाहरणार्थ, क्रॉनिक लिम्फोसाइटिक ल्युकेमिया (CLL) या प्रकारात कुटुंबात एकापेक्षा अधिक व्यक्तींना हा आजार झाल्याचे आढळून आले आहे. शिवाय, ली-फ्रॉमेनी सिंड्रोम, फॅन्कोनी ॲनिमिया आणि इतर काही अनुवंशिक आजारांमुळे रक्ताच्या कर्करोगाचा धोका वाढतो. अशा कुटुंबाच्या सदस्यांनी जेनेटिक काउन्सिलिंग आणि नियमित तपासणी करणे उपयुक्त ठरते.

जरी आधुनिक तपासणीच्या सुविधा उपलब्ध असल्या, तरी सध्या रक्ताच्या कर्करोगासाठी कोणतीही ठोस स्क्रिनिंग टेस्ट उपलब्ध नाही. त्यामुळे लक्षणांवर लक्ष ठेवणे आणि साध्या रक्त तपासणीत आलेले बदल योग्य वेळी ओळखणे हेच वेळेवर निदानाचं आणि चांगल्या उपचार परिणामाचं मुख्य साधन आहे.

## समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करावे लागेल

### – प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** केवळ जप करत बसलो, तर काम होणार नाही. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले होते, 'माझे स्मरण कर पण युद्ध कर !' स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे आपल्या देशावर काळ्या इंग्रजांची सत्ता होती. आपला देश धर्मशाळा बनला आहे. आता समाजाला अधर्माचा प्रतिकार करण्यासाठी तयार करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या आड येणाऱ्या कायद्यांमध्ये पालट करून देशात कोणते कायदे हवेत, यावर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सनातन धर्माच्या प्रसाराचे कार्य ही साधना, ईश्वराची उपासना आहे. आपण आपल्या व्यक्तीत्वाची बाजी लावून आणि संघटित होऊन परमात्म्याच्या सेवेत स्वतःला अर्पण केले पाहिजे. तर स्वर्णिम काळ दूर नाही, असे मार्गदर्शन श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी यांनी केले. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक हिंदू उपस्थित होते.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवातील 'सनातन राष्ट्र संकल्प' सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर सनातनचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते देवकीनंदन ठाकूर, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्र पुरी महाराज, आचार्य महामंडलेश्वर अनंत विभूषित श्री श्री १००८ स्वामी बालकानंद गिरीजी महाराज, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अश्विनी उपाध्याय, अयोध्या येथील सिद्धपीठ हनुमान गढी मंदिराचे महंत राजूदासजी महाराज, इंडोनेशिया येथील धर्मस्थापनम् फाऊंडेशनचे पू. धर्मयशजी महाराज, स्वामी आनंद स्वरूप आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे दर्शक हाथी हे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांमध्ये सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति अंजली गाडगीळ यांचीही वंदनीय उपस्थिती होती.

## शैक्षणिक क्षेत्रातील लढाऊ नेतृत्व हरपले

# किरन काटे यांचे अपघाती निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण * संजय कांबळे



वाळवा-इस्लामपूर तालुक्यातील पेठनाका येथे जन्म झालेले आयु, किरन वंसत काटे यांनी आपल्या बुध्दीमत्तेच्या आणि अचाट अशा संघटनकौशल्याच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात, तसेच तरुणांच्या आयुष्यात अमुलाग्र बद्दल घडवून ठाणे जिल्हा आपली 'कर्मभूमी,बनवलेल्या काटे सरांचे नुकतेच एका छोट्याशा अपघात दु:खद निधन झालं, त्यांच अस अचानक निघून जाणं अनेकांच्या मनाला चटका लावणार असून शैक्षणिक क्षेत्रातील एक लढाऊ नेतृत्व हरपल्याची भावना अनेक शिक्षकांनी व्यक्त केली आहे, यामुळे कल्याण तालुक्यासह कांबा गावावर तसेच त्यांच्या मुळ गाव असलेल्या पेठनाका गावावर शोककळा पसरली आहे.साधारण पणे१९५० च्या आसपास इस्लामपूर जवळील पेठनाका येथील वंसत काटे हे शिक्षक म्हणून कल्याण तालुक्यात हजर झाले, दळणवळणाच्या सोईसुविधा नसल्याने ते कधी बैलगाडी तर कधी पायी चालत जाऊन तालुक्यातील विद्यार्थी घडवत होते, त्यांची तब्बल३७ वर्षे सेवा होऊन ते सध्या सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून त्यांचा मुलगा' किरन, १९९३ मध्ये शिक्षकी पेशात आले,क्रांतीवीर,नागनाथअण्णा नायकवडी, कर्मचारी भाऊराव पाटील यांच्या वाळवा तालुक्यातील हे पाणी कसे शांत राहणार?कांबा गावात स्थायिक झालेल्या किरन काटे सरांनी प्रथम काम केले ते गावातील व्यसनाधीनतेकडे वळलेल्या तरुण पिढीला एकत्र करून जय महाराष्ट्र मंडळ स्थापन केले, पुढे राजे शिव छत्रपती प्रतिष्ठान निर्माण करून त्यांच्या माध्यमातून रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, दाखले वाटप, आरोग्य शिबीर, नैसर्गिक आपत्ती च्या वेळी नागरिकांना अन्नदान वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमाने तरुण पिढी व्यस्त झाले, त्यामुळे ते मुलांचे'सर, तर सर्वांचे'बापू, बनले,अंगभूत संघटनकौशल्य,अफाट बुध्दीमता, हजरजबाबीपणा, यामुळे ते शिक्षक संघटनेचे नेते बनले, शासकीय निधी कधी कुठे, कसा आणायचा!हे त्यांनी बनवलेल्या, म्हारळ, दहिवली, आणि म्हसरोंडीच्या झेडपी शाळा बघितल्यावर लक्षात येते,संभाजीराव थोरात प्रणित प्राथमिक शिक्षक संघटनेच्या माध्यमातून कल्याण, ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांचे विविध प्रश्न, बदल्या,मेडिकल बिले, पटसंख्या वाढविण्यासाठी त्यांनी भरिव काम केले, या दरम्यान त्यांचे आणि प्रशासणाचे वेळोवेळी खटके उडाले, गशिना निलंबित व्हावे लागले, पेपर फुटी प्रकरण, कोंबडी पार्टी त्यांनी गाजवले होते. संघटनेच्या माध्यमातून ते संपूर्ण महाराष्ट्रात फिरत होते, शिक्षकांच्या अन्यायकारक बदल्या विषयीतर पत्नी संगीता किरन काटे विरुद्ध महाराष्ट्र शासन अशी कायदेशीर लढाई लढून हायकोर्टातील निकालाने खचून न जाता सुप्रीम कोर्टात धाव घेऊन ते केस जिंकले, याचा फायदा महाराष्ट्रातील लाखो शिक्षकांना झाला.शिक्षक संघटनेच्या माध्यमातून त्यांचा सर्वच पक्षातील आमदार, खासदार, मंत्र्याशी संबंध आला, त्यामुळे बहुजन शिक्षक त्यांच्या कडे आपोआप ओढला गेला. शिक्षकांचे'झुंझार, नेतृत्व म्हणून ते नावारूपाला आले होते. कायद्याचे सखोल ज्ञान असल्याने ते कोणाला भीग घालत नव्हते, कायदेशीर लढाईत ते'बापमाणूस, होते. अशा या अष्टपैलू नेतृत्वावर काळाने घाला घातला, आपल्या मूळ पेठनाका या गावी सुट्टीसाठी गेले असता रस्त्यावर टाकलेल्या खडीवरुन त्यांची बाईक घसरली, व त्यांच्या डोक्याला मार लागला, मुलगा आतिष याने तात्काळ इस्लामपूर, व नंतर कोल्हापूर येथे उपचारार्थ हलविले, परंतु काही फायदा झाला नाही, या दरम्यान सुमारे१५/२० हजार लोकांनी त्यांची विचारफूस केली, यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षक संघटनेचे संभाजीराव थोरात, आदींचा ही समावेश होता, अखेरीस त्यांना कल्याण ला आणले, मिरा हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू असतानाच काल त्यांची प्राणज्योत मालवली, आणि सर्वांना धक्का बसला, त्यांच्या पश्चात आईवडील, पत्नी, मुले असा परिवार आहे.त्यांच्या अचानक निघून जाण्याने शिक्षक संघटनेत मोठी पोकळी निर्माण झाली असून, शिक्षकांचा'वाली, निघून गेल्याची भावना निर्माण झाली आहे, या घटनेमुळे संपूर्ण कांबा गावासह कल्याण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ पेण शहरात तिरंगा रॅली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** पेण शहरामध्ये भारतीय सैन्यांच्या सन्मानार्थ तिरंगा रॅलीचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. भारत देशाच्या सीमांवर आपल्या जवानांनी दाखवलेला पराक्रमाचा, त्यागाचा आणि शौर्याचा सन्मान व समर्थन दर्शवण्यासाठी आपली देशभक्ती दर्शवत अनेक नागरिक या तिरंगा रॅलीमध्ये सामील झाले होते.

रॅलीत माजी सैनिकांसह शेकडो तरूण, महिला ज्येष्ठ नागरिक विविध संस्थांचे पदाधिकारी विविध शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक व पेणकर नागरिक व सर्व समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भारत माता की जय ,वीर जवानांचा जयजयकार करीत विविध घोषणा देत सहभागींनी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पेण येथील महात्मा गांधी वाचनालय पासून पेण नगर पालिका, पां.का.पाटील चौक, खाटीक आळी, हनुमान मंदिर, पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकात पर्यंत खासदार धैर्यशील पाटील व आमदार रविंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी रा जि.प.माजी अध्यक्षा ॲड.निलिमा पाटील माजी जि.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे, डि.बी.पाटील माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, उपनगराध्यक्षा वैशाली कडू ॲड.मंगेश नेने, ॲड.आस्वाद पाटील चित्रा पाटील, गिता पालरेचा राजेश मपारा यांच्यासह पेणकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेण पोलिसांनी संपूर्ण सुरक्षा पुरवत वाहतुकीचे योग्य ते नियोजन केले.

## कंळभे येथे तुळजा भवानीचा जागर गोंधळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
(बाळासाहेब भालेराव)

मुरबाड तालुक्यातील कळभे येथे आई तुळजा भवानी शक्ती बुधवार २१ मे २०२५ रोजी आई तुळजा भवानी शक्ती पीठ मंदिर कळंभे,मुरबाड देवीचा मान व आईचा जागर गोंधळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे सदर कार्यक्रमची वेळ रात्री ७ ते ११ पर्यंत कार्यक्रमाची रूपरेषा आहे देवीचे जागर गोंधळ, व प्रसाद भंडारा गोंधळी राजू शिंदे ऐरोली नवी मुंबई यांच्या मार्फत होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भक्त भाविक व नागरिकांनी भंडारा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन या मंदिराचे विश्वस्त तथा ठाणे जिल्हा शिवसेना संघटक शशी यादव यांनी केले आहे.








सोमवार
१९ मे २०२५

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल. | विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळेल. नवीन कामाचा विचार करण्याची संधी मिळू शकते. | दिवस तुमच्यासाठी चांगला परिणाम देईल. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे. | अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, काम वेळेवर आणि सहज पूर्ण होण्यास मदत होईल. | विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. | या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते. | आज तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. कामात मदत लागेल, चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. | महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार | व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. | विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. |

# मिरा भाईंदर मनपाच्या मालमत्तांचे डिजिटलायझेशन आयुक्त राधा बिनोद शर्मा यांचा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा भाईंदर महापालिकेच्या मालमत्ता प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली घेण्यासाठी त्यांचे डिजिटलायझेशन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यामुळे कामकाजात पारदर्शकता वाढणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. महापालिकेच्या कामकाजात डिजिटल पद्धतीचा अधिकाधिक वापर करण्यावर प्रशासनाचा भर आहे.

मागील दोन वर्षांत ई-ऑफिस'सारखे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात महापालिकेला यश आले आहे. आता त्याचाच पुढचा टप्पा म्हणून, महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्या डिजिटल यंत्रणेखाली आणण्याचा निर्णय आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी घेतला आहे.



महापालिकेच्या मालकीच्या अनेक वास्तू असून त्यापैकी काही भाडे तत्वावर देण्यात आल्या आहेत, ज्यातून प्रशासनाला उत्पन्न मिळते. तर काही वास्तूंच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. याशिवाय मालमत्ता विभागाच्या ताब्यात असलेल्या व प्रस्तावित वास्तूंचीही मोठी यादी आहे. सध्या या वास्तूंचे कामकाज मिळकत तसेच अन्य विभागांमार्फत चालवले जाते. यामुळे संबंधित माहिती मिळवण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते आणि कामाच्या पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेच्या सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांचे डिजिटलायझेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### ऑनलाईन उपलब्ध होणार सविस्तर माहिती

महापालिकेच्या वास्तूंचे सर्वेक्षण करण्यासाठी लवकरच एका कंत्राटदाराची निवड करण्यात येणार आहे. संबंधित कंत्राटदार या सर्व वास्तूंचे जिओ टॅगिंग करणार असून त्या मालमत्तांना डिजिटल यंत्रणेशी जोडले जाणार आहे. त्यामुळे संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून कोणतीही वास्तू, तिची स्थिती, वापर व देखभाल याविषयीची माहिती सहज मिळू शकेल, अशी माहिती आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी दिली आहे.

# पार्किंगच्या वादातून कोनगावात चौघांवर चाकूहल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथील कोनगाव भागात वाहन उभे करण्याच्या वादातून चार जणांवर चाकूने हल्ला करण्यात आला. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी साहिल शेख याला अटक केली आहे. तर त्याच्या साथिदार अनिकेत पुजारी याचा पोलीस शोध घेत आहेत.

राहुल गुप्ता, शुभम गुप्ता, अनिकेत पाटील आणि ऋषिकेश चव्हाण अशी जखमींची नावे आहेत. कोनगाव भागात राहणाऱ्या राहुल गुप्ता यांच्या वाहन उभे करण्याच्या जागेमध्ये अनिकेत पुजारी याने त्याचे वाहन उभे केले होते. त्यावेळी राहुल याने अनिकेत पुजारी याला त्याचे वाहन बाजूला उभे करण्यास उभे करण्यास सांगितले. परंतु अनिकेत पुजारी याने त्याच्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली.

अनिकेत पुजारी याचा मित्र साहिल आणि राहुल याचा भाऊ शुभम देखील त्याठिकाणी आले. त्यानंतर राहुल आणि शुभम या दोघांना त्यांनी शिवीगाळ आणि मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अनिकेत पुजारी याने त्याच्या हातातील धारदार शस्त्राने राहुल आणि शुभमवर हल्ला केला. राहुल आणि शुभमच्या मदतीला अनिकेत पाटील आणि ऋषिकेश चव्हाण हे दोघे आले असता, त्यांच्यावरही अनिकेत पुजारी याने वार केले. त्यानंतर त्यांनी नागरिकांना देखील दहशत दाखविण्याचा प्रयत्न केला.

काहीवेळाने अनिकेत पुजारी आणि साहिल हे दोघे तेथून निघून गेले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. तसेच याप्रकरणी पोलिसांनी साहिल शेख याला अटक केली आहे

## पीक विमा न मिळाल्याने वसईतील आंबा बागायतदार संकटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** वसईच्या शेतकऱ्यांनी २०२३-२४ मध्ये काढलेला आंबा फळ पीक विमा नुकसान होऊनही शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यामुळे येथील आंबा फळ बागायतदार शेतकऱ्यांना विम्यापासून वंचित राहावे लागत आहे. वसई पूर्वेच्या भागात अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वाडीत आंब्याची लागवड केली आहे. मात्र मागील काही वर्षांपासून वातावरणातील लहरीपणा, अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा यासाठी प्रधानमंत्री फळ पिक विमा योजना आखली आहे. या योजनेअंतर्गत रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीत २०२३-२४ मध्ये वसई पूर्वेच्या खानिवडे येथील ८२ शेतकऱ्यांनी आंबा फळ पीक विमा उतरविला होता. यात सुमारे ३२ हेक्टर इतके क्षेत्र पीक विम्या खाली होते. त्या वर्षी अवकाळी पाऊस वादळी वारे यांने आंबा फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

या नुकसानी नंतर येथील शेतकऱ्यांचे पंचनामे ही करण्यात आले होते. मात्र वर्ष भराचा कालावधी उलटून गेला तरीही अजूनही विम्याद्वारे या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. पीक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना सांगितले जाते मात्र जेव्हा नुकसान भरपाई देण्याची वेळ येते तेव्हा केवळ कारणे पुढे केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पीक विम्याची नुकसान भरपाई मिळाला नसल्याने याची तक्रार बोईसरचे आमदार विलास तरे यांच्या जनता दरबारात शेतकऱ्यांनी केली आहे. या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविले असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

वसईच्या महसूल मंडळ मांडवी मधील हवामान नोंदणी यंत्रप्रणाली अस्तित्वात नसल्या मुळे, हवामान नोंद प्राप्त झाली नाही, विमा जारी करताना हवामान यंत्रप्राणालीची नोंदणी आवश्यक आहे. ती नसल्याने विम्याची भरपाई देण्यात अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. या अडचणीमुळे नुकसान भरपाई साठी नाहक शेतकऱ्यांना अजून ही वंचित राहावे लागले आहे.

# ठाण्यातील जांभळी नाका बाजारपेठेत झाड पडून दोन व्यक्ती जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहरातील जांभळी नाका बाजारपेठ परिसरात असलेल्या मराठी ग्रंथ संग्रहालय जवळील एक झाड पडून दोन व्यक्ती जखमी झाल्याचा प्रकार रविवारी दुपारी घडला. या दोन्ही व्यक्तींना उपचारासाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. ठाण्यातील जांभळी नाका बाजारपेठ ही शहरातील मुख्य बाजारपेठ आहे. त्यामुळे या बाजारपेठेत सकाळ-संध्याकाळ नागरिकांची रेलचेल सुरु असते.

रविवार म्हणजेच सुट्टीच्या दिवशी शहराच्या कानाकोपऱ्यातून नागरिक या बाजारपेठेत खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे यादिवशी बाजारात नागरिकांची प्रचंड गर्दी होते.



या बाजारपेठेत मराठी ग्रंथ संग्रहालयाची इमारत आहे. या इमारतीच्या संरक्षण भिंतीच्या दुरुस्तीचे काम सुरु होते. हे काम सुरु असताताना, इमारतीच्या बाहेर असलेले एक झाड अचानक पडले. या घटनेत संरक्षण भिंतीचे काम करणाऱ्या दिलीप गुप्ता (३५) आणि सुनील गौड (४८) हे दोन मजुर जखमी झाले. दिलीप यांच्या हाताला व खांद्याला तर, सुनील यांच्या हाताला दुखापत झाली.

घटनेची माहिती मिळताच, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१ पिकअप वाहनासह, वृक्षप्राधिकरण विभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान ०१ इमर्जन्सी वाहनासह घटनास्थळी पोहोचले. जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनास्थळी पडलेले झाड आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, वृक्षप्राधिकरण विभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने कापून बाजूला करण्याचे काम सुरू आहे.

## पालघरच्या देहरजी धरणाचे ८० टक्के काम पूर्ण
# २०२७ पर्यंत प्रकल्प सुरू होणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर :** वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी पालघर जिल्ह्यातील विक्रमगड जवळ बांधण्यात येत असलेल्या देहरजी धरण प्रकल्पाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने जाहीर केले आहे. २०२७ पर्यंत हा महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील सुकसाळे गावाजवळून वाहणाऱ्या पश्चिमवाहिनी वैतरणा नदीची उपनदी असलेल्या देहरजी नदीवर देहरजी धरण प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पांतर्गत माती व दगडांचा वापर करून धरण बांधण्यात येत असून या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९५,६० दशलक्ष घनमीटर इतकी आहे. त्यापैकी ९३.२२



दशलक्ष घनमीटर म्हणजे साधारण प्रतिदिन २५५ दशलक्ष लिटर इतके पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणार आहे. कोकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे देहरजी प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व एममएमआरडीए यांच्यातील सामंजस्य करारानुसार एमएमआरडीएने या प्रकल्पासाठी २५९९.१५ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य केले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या देहरजी मध्यम प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या जलसाठ्याच्या वापरासाठी व्यापक पाणीपुरवठा योजनेचा सखोल प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. देहरजी धरणासाठी विक्रमगड तालुक्यातील साखरे, खुडेद आणि जांभा गावातील २३८ हेक्टर खाजगी तसेच ४४५ हेक्टर वन जमीन अशी एकूण ६८३ हेक्टर जमीन बुडीत क्षेत्रात जाणार असून जवळपास २७२ कुटुंबे बाधीत होणार आहेत. बाधित कुटुंबाचे वाडा तालुक्यातील खरीवली (कोहोज) येथे पुनर्वसन होणार असून त्यासाठी २९.८६ हेक्टर खाजगी जागेचे संपादन करण्यात आले आहे. मात्र धरणामुळे बेघर होणाऱ्या कुटुंबीयांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर धीम्या गतीने सुरू असून आधी संपूर्ण पुनर्वसन आणि नंतरच धरण अशी बाधित नागरिकांची प्रमुख मागणी आहे.

# बाजारात जांभळाची मोठ्या प्रमाणावर आवक : आदिवासींना रोजगार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी :** वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत (एपीएमसी) सध्या जांभळांची मोठी आवक सुरू असून, परिसरातील खेड्यांतून आणि आदिवासी भागांतून मोठ्या प्रमाणात हे फळ बाजारात दाखल होत आहे. महाराष्ट्रातील बदलापूर, खोपोली, कर्जतसह गुजरातहूनही जांभळांची आवक होत असून, प्रतिदिन दोन ते तीन गाड्यांमधून रसाळ जांभळे विक्रीसाठी येत आहेत. सध्या प्रतिकिलो दर ३५० ते ५५० रुपयांदरम्यान आहे. जांभळाचा हंगाम मे अखेरीस सुरू होतो आणि जुलैच्या मध्यापर्यंत टिकतो. त्यामुळे हा हंगाम केवळ दीड ते दोन महिन्यांचा असून, रसिकांनी वेळेत या चविष्ट फळाचा आस्वाद घ्यावा, असा सल्ला व्यापाऱ्यांकडून दिला जात आहे.

कोकण, विदर्भ, रायगड, नाशिक, गडचिरोलीसारख्या भागांतील आदिवासी कुटुंबे या हंगामात जांभळाचे संकलन करतात. काही ठिकाणी महिला बचत गट या प्रक्रियेत सहभागी असून, फळ संकलनापासून विक्रीपर्यंतच्या सर्व टप्प्यांत स्थानिकांना रोजगार मिळतो. यातून आदिवासी कुटुंबांना हंगामी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होते. अनेक भागांत जांभळावर प्रक्रिया करून रस, पावडर, जॅम, जेली इत्यादी उत्पादने तयार केली जात आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर प्रक्रिया केंद्रांनाही चालना मिळत आहे. पावसाळ्याच्या आगमनानंतर जांभळाची उपलब्धता झपाट्याने कमी होते. त्यामुळे जांभळाचा आस्वाद घेण्यासाठी हे काहीच दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत. बाजारात सध्या चांगल्या प्रतीची जांभळे मिळत असल्याने ग्राहकांनी ही संधी न चुकवता खरेदी करून आरोग्यदायी चव अनुभवावी, असा सल्ला एपीएमसीतील फळ व्यापारी महेश बाळसराफ यांनी दिला आहे.



## शंभर दिवसांच्या कार्यालय सुधारणा कार्यक्रमात
# माणगाव शिक्षण विभाग कोकणात दुसरा



### गट शिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर / माणगांव

■ विश्वास गायकवाड

राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शासनाच्या सर्व विभागांसाठी एक महत्वकांक्षी १०० दिवसांचा सात कलमी कार्यालयीन सुधारणा विशेष कृती आराखडा उपक्रम हाती घेतला होता. या १०० दिवसांच्या धोरणात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक योजना, विकासाची कामे, अनेक प्रकल्प मार्गी लावण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची संकल्पना मांडली होती. नुकताच या १०० दिवसांच्या कामांचा अहवाल राज्य सरकारने सादर केला आहे. या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात माणगाव तालुक्याच्या शिक्षण विभागाने अतिशय कौतुकास्पद कामगिरी केली होती. याचाच परिणाम म्हणून शिक्षण विभाग, शिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती माणगाव ला कोकण विभागातून द्वितीय क्रमांक मिळालेला आहे. या यशा बद्दल मा. गट शिक्षणाधिकारी आद. सुरेखा तांबट मॅडम यांचे व त्यांच्या संपूर्ण शिक्षण विभागाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. राज्याचे मा. मुख्यमंत्री आद. फडणवीस साहेबांनी महाराष्ट्रातील सर्वच तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरी बद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आद. नेहा भोसले मॅडम, जिल्हा शिक्षणाधिकारी आद. पुनिता गुरव मॅडम व अन्य असंख्य मान्यवरांनी हा बहुमान पटकावल्या बद्दल आद. सुरेखा तांबट मॅडम यांचे व त्यांच्या संपूर्ण शिक्षण विभागाचे विशेष कौतुक केले आहे.

# नैना प्रकल्पासाठी हजरो वृक्षांवर कुऱ्हाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातून पुढील काही दिवसांत विमानोड्डाण सुरू होत असताना सिडको मंडळाच्या उच्चपदस्थांनी नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राच्या (नैना) विकास प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले आहे. नैना प्रकल्पातील नगर परियोजना क्रमांक (टीपीएस) २ ते १२ यामध्ये तब्बल पावणेआठ हजार झाडांची कत्तल सिडको मंडळाला करावी लागणार असल्याची माहिती सिडकोच्या विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली.

नैना प्रकल्पाचा पर्यावरण अहवाल अद्याप टीपीएसमधील ३० गावांमधील शेतकऱ्यांना सिडको मंडळाने गावाच्या बांधावर जाऊन समजवलेला नसल्याने या प्रकल्पामुळे शेती नष्ट होऊन येथे नियोजित शहर निर्माण केले जाणार आहे. त्यामुळे येथील शेतजमिनी नष्ट होत असल्याने येथील शेतकरी विकसक होण्याच्या वाटेवर आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत २५ किलोमीटर क्षेत्रावर नैना प्रकल्प होत आहे. मागील १२ वर्षांपासून या प्रकल्पाला संथगतीने असल्याने या प्रकल्पाचे काम सुरू होईल की नाही अशी साशंकता आहे. सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या प्रकल्पाच्या विकासकामांसाठी साडेसात हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा ठेका देण्यासाठी जोरदार पावले उचलली. येऊ घातलेल्या सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत निवड केलेल्या विकसक कंपन्यांनी साडेसात हजार कोटी रुपयांचे काम देण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे शेतजमीनीचे क्षेत्र कमी होऊन त्याऐवजी इमारतींचे विकसित भूखंडाचे वाटप होऊन अधिवासासाठी लागणारी पायाभूत सुविधा येथे पुढील काही वर्षांमध्ये उभारल्या जातील.

नैना प्रकल्पामध्ये अद्याप पर्यावरणाविषयी सिडको मंडळाने या परिसरात मागील १२ वर्षात कोणतीही जनजागृती केली नाही. त्यामुळे पर्यावरण दृष्टीकोनातून शेतकऱ्यांच्या बदलत्या जीवनशैलीवर होणारा परिणाम याबाबत शेतकरी अनभिज्ञ आहेत. नैना प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांच्या विकासकामांपूर्वी झाडांची कत्तल करून या झाडांचे पुनर्रोपण कुठे करणार याची माहिती सिडकोचे अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. याबाबत सिडकोच्या पर्यावरण विभागाने अद्याप नैना प्रकल्पाच्या झाडांची कत्तलीसाठी कोणत्याही विभागाला परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच नैना प्रकल्पामधील झाडांच्या कत्तलीनंतर झाडांच्या पुनर्रोपण आणि संवर्धनाच्या कार्यक्रमाची माहिती सिडको अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही.

## उल्हासनगरात तिरंगा रॅलीतून भारतीय सैन्य दलातील जवानांना सलाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि दहशतवाद्यांना जोरदार प्रत्युत्तर देणाऱ्या भारतीय लष्कराच्या शौर्याच्या सन्मानार्थ उल्हासनगर शहरात भाजपाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया आणि आमदार कुमार आयलानी यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅली काढण्यात आली होती. उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेल्या या रॅलीत सेवानिवृत्त आर्मी ऑफिसरांचा सहभाग लक्ष वेधणारा ठरला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पहलगाम हल्ल्याचे यशस्वी प्रत्युत्तर दिले. या यशस्वी मोहिमेनंतर सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीत हजारो नागरिक, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# महावितरणने छाटलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित उचलाव्यात -जीवन पाटील यांची मागणी






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण शहरात ठीक ठिकाणी विज मंडळाने मंगळवारी झाडे तोडली असून फांद्या व पालापाचोळा तसाच ठेवला असल्यामुळे लोकांचा येण्या जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. पेण उपजिल्हा रुग्णालय येथील अवस्था अतिशय बिकट असून रुग्णांना जाण्या येण्याचा गेट पूर्णपणे बंद झाला आहे.रायगड बाजार समोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याचप्रमाणे पावसाळा तोंडाशी असल्यामुळे दुर्गंधी पसरण्याच्या अगोदरच विज मंडळ व नगरपरिषद प्रशासनाने योग्य ती कारवाई करून सदर रस्त्यावर पडलेली झाडे त्वरित उचलून लोकांचा मार्ग मोकळा करणे गरजेचे आहेत अशी मागणी पेण करांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते जीवन पाटील यांनी केली आहे. काही ठिकाणी एम एस कव्हर्स निघालेले आहेत, पावसाळा तोंडाशी असल्यामुळे लहान मुलं, वयस्कर नागरिक यांचे अपघात होणार नाहीत याची दक्षता घ्यावी असेही सांगितले.






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# मिशन सिंदुरच्या यशस्वी कामगिरीबद्दल डोंबिवलीत भव्य तिरंगा रॅली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय जवानांनी पाकिस्तानमधील दहशतवादि तलावर हवाई हल्ला करून 100 अतिरेक्याना मारले. भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ महायुती सरकारकडून राज्यभरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी 18 तारखेला डोंबिवलीत काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत भारतीय जनता पार्टी कार्यकारी प्रदेश अध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण, आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, कल्याण जिल्हाअध्यक्ष नंदू परब, मितेश पेणकर, कर्ण जाधव, धनाजी पाटील, प्रकाश पवार, शिवसेना आमदार राजेश मोरे, माजी नगरसेवक रमेश म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, तालुका प्रमुख महेश पाटील, माजी नगरसेवक संजय पावशे, गजाजन पाटील, संतोष चव्हाण, सागर जेधे, विवेक खामकर, कविता गावंड तेजस पाटील, संजय निक्ते यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. तिरंगा रॅलीत हजारो डोंबिवलीकर सहभागी झाले होते. भाजपा आणि शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह हजारो डोंबिवलीकरांनी तिरंगा रॅलीत हातात तिरंगा झेंडा घेऊन सहभागी झाले होते. या रॅलीमुळे संपूर्ण वातावरण तिरंगामय झाल्याचे पाहायला मिळाले. श्रीगणेश मंदिर येथून तिरंगा रॅलीला सुरुवात करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शहीद कॅप्टन विनयकुमार सच्चान येथे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते आणि उपस्थित डोंबिवलीकरांनी भारत माता की जय म्हणत मानवदंना देवून राष्ट्रगीतानंतर रॅली समाप्त झाली.

## संसदीय कार्य मंत्रालयाच्या राजभाषा सलाहकार समितीवर प्रवीण देशमुख यांची निवड

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



सुप्रसिद्ध विचारवंत प्रवीण देशमुख यांची संसदीय कार्य मंत्रालयाच्या राजभाषा सलाहकार समितीवर निवड...अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोकण प्रांतचे कार्याध्यक्ष प्रवीण श्रीराम देशमुख यांची भारत सरकारतर्फे संसदीय कार्य मंत्रालयाच्या राजभाषा सलाहकार समितीवर निवड करण्यात आली आहे. प्रवीण देशमुख हे एक साहित्यिक, विचारवंत, व्याख्याते व कवी म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांनी आजतागायत निःस्वार्थ व निष्काम वृत्तीने आणि समर्पण भावनेने साहित्य, समाज व राष्ट्र विकासासाठी सुमारे ४५ हून अधिक वर्षांचे योगदान दिले आहे. भारत सरकारने अधिसूचना क्रमांक फा. ४(१)२०२३/हिंदी, भारत सरकार, संसदीय कार्यमंत्रालय दि.१ मे २०२५ द्वारे गृहमंत्रालयाच्या शिफारशीनुसार तीन वर्षांसाठी या समितीवर निवड केली आहे. संसदीय कार्य व अल्पसंख्यक कार्यमंत्री किरण रिजिजू या समितीचे अध्यक्ष असून खासदार मनोज तिवारींसह महाराष्ट्रातील खासदार श्रीरंग (आप्पा) चंदू बारणे यांचाही समितीत समावेश आहे. सदर समिती भारत सरकारला सरकारी कारभारात राजभाषा हिंदीच्या वापरा संबंधी सल्ला देईल. या समितीच्या बैठका दिल्लीत होतील. राष्ट्रीय पातळीवरील सदर समितीवर प्रवीण देशमुख यांची निवड होणे ही केवळ ठाणे जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अभिमानाची आणि कौतुकाची गोष्ट आहे. या समितीवर निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातील साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध सेवाभावी संस्था यांच्याकडून प्रवीण देशमुख यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनचा वर्षाव होत आहे. त्यांचे कौतुक केले जात आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. बळीराम गायकवाड व सर्व पदाधिकारी तसेच कोकण विभागातील अनेक सदस्यांकडून सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी प्रवीण देशमुख यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोंकण प्रांतचे कोषाध्यक्ष तथा राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्था पाली शहापूर या संस्थेतर्फे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांनीही प्रवीण देशमुख यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## पेण आरटीओ कार्यालयात जप्त वाहनांचा ई - लिलाव

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**पेण :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांच्या वतीने मोटार वाहन कायदा १९८८ व मुंबई मोटार वाहन कर नियम १९५८ अन्वये जप्त करण्यात आलेल्या ६० वाहनांचा ई-लिलाव दि. २७ मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा लिलाव महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये कराधान प्राधिकाऱ्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून घेण्यात येत आहे.

ई-लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुकांनी ३४ हजार नोंदणी शुल्क (ना परतावा) आणि रु. ४ लाख ९४ हजार ठेव रक्कम (परतावा) DD द्वारा "Dy RTO PEN" या नावाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे भरावयाची आहे. लिलावाची सविस्तर माहिती व अटी http://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर दि. १६ मे २०२५ पासून उपलब्ध आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, पेण यांनी कोणतेही कारण न देता लिलाव रद्द अथवा तहकूब करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. इच्छुकांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून आणि अटी-शर्तींची पूर्तता करून लिलावात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




**ई-लिलावाचे वेळापत्रक**
**नोंदणी सुरुवात:**
२० मे २०२५ सकाळी १० वाजता
**नोंदणी समाप्ती:**
२१ मे २०२५ दुपारी ५ वाजता.
**कागदपत्र पडताळणी व मंजुरी:**
२२ मे २०२५ सकाळी ११ वाजता

**वाहने पाहणीची वेळ:**
**सुरुवात:**
१७ मे २०२५ सकाळी १० वाजता
**शेवट:**
२५ मे २०२५ सायंकाळी ६ वाजता

**ई-लिलाव : दिनांक: २७ मे २०२५**
**वेळ: दुपारी १२ ते २ वाजता**

## कल्याणातून अमली पदार्थासह एका आरोपीला अटक

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** कल्याण व डोंबिवली शहर परिसरात बेकायदेशीर अमली पदार्थ विक्री करणाऱ्यावर कठोर कारवाई करत परिमंडळ ३ कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या विशेष पथकाने व खडक पाडा पोलीस ठाण्याने संयुक्त कारवाई केली. १७ मे २०२५ रोजी ८.१५ वाजता. खडकपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ९० फुटी रोडवरील अटाळी आंबिवली जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर ही कारवाई पार पडली. या कारवाईदरम्यान गुलाम मोसन खान उर्फ इराणी (वय ३५ वर्ष) रा. इंद्रा नगर झोपडपट्टी, आंबिवली, कल्याण यांच्याकडून २९ ग्रॅम वजनाचा मेफोड्रोन (एम.डी.) अमली पदार्थ जप्त करण्यात आला. या पदार्थाची अंदाजे किंमत ,५६,००० रु. असून, पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात अमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ अंतर्गत कलम ८(क) व २०(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुलाम मोसन खान उर्फ इराणी याच्यावर यापूर्वीही खडकपाडा , महात्मा फुले चौक, व नारपोली पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्ह्याची नोंद आहे. ही कारवाई परिमंडळ ३ कल्याणच्या विशेष पथक व खडकपाडा पोलीस ठाण्याच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली असून, अशा बेकायदेशीर कृत्यावर कारवाई पुढेही चालू राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## अंबरनाथ शहरात तिरंगा यात्रेचे आयोजन

### यात्रेत सहभागी होण्याचे दयानंद चोरघे यांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.१८** "ऑपरेशन सिंदूर" मध्ये भारतीय जवानांनी केलेल्या शौर्याला सलाम करण्यासाठी तसेच अतिरेकी हल्ल्यात बलिदान दिलेल्यांप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी बुधवार दिनांक २१ मे २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात "तिरंगा यात्रा" काढण्याचा निर्णय प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतला असून त्यांच्या आदेशानुसार व ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या सूचनेनुसार अंबरनाथ शहर ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील व बदलापूर शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय जाधव यांच्या वतीने जिल्हा स्तरीय "तिरंगा यात्रा" देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीवजी गांधी यांच्या स्मृतिदिनी दिनांक २१ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता अंबरनाथ (पश्चिम) शहर येथे आयोजित केली असून या तिरंगा यात्रेत काँग्रेस कार्यकर्त्यांसह देशप्रेमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेसचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केले आहे.



देशाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर विरोधक असलेल्या काँग्रेसने राजकारण बाजूला ठेवून सत्ताधारी पक्षाला पाठिंबा दिला. ऑपरेशन सिंदूर यशस्वी करण्यासाठी भारतीय सैनिकांनी प्राणाची बाजी लावून पाकिस्तानला धूळ चारली आहे. भारतीय सीमेवर सैनिक लढत आहेत म्हणून भारत सुरक्षित आहे. अशा निधड्या छातीच्या सैनिकांचा सन्मान करणे हे प्रत्येक देशप्रेमी नागरिकाचे कर्तव्य असून त्यानिमित्ताने काँग्रेस पार्टी तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात तिरंगा यात्रा आयोजित केली असून ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या वतीने बदलापूर शहर काँग्रेस व अंबरनाथ शहर काँग्रेस आयोजक असलेल्या अंबरनाथ पश्चिम येथील तिरंगा यात्रेत काँग्रेस, महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी व देशप्रेमी जनतेने उपस्थित राहावे असे दयानंद चोरघे यांनी आवाहन केले आहे.

## कल्याण ग्रामीण परिसरातील कुपोषित मुलांना पोषक आहार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईडचा उपक्रम**




**कल्याण :** सामाजिक बांधलिकीचा वसा जोपसणार्या रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साइड या संस्थेच्या माध्यमातून कुपोषित मुलांना तसेच आगंणवाडीच्या मुलांना आहार वाटपाचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. कल्याण ग्रामीण परिसरात रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईड ही संस्था गेली 14 वर्षापासून कुपोषित बालकांसाठी कल्याण ग्रामीण, मुरबाड , शहापूर आदिवासी क्षेत्रात काम करीत आहे.

त्याअनुषंगाने कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या सोबत विविध उपक्रमांवर रोटरी क्लबने चर्चा केली त्यात प्राधान्याने कुपोषित मुले व अंगणवाडी साठी काम सुरू केले. त्याचाच एक भाग कुपोषित मुलांना पोषक आहार व 13 अंगणवाडीतील मुलांना आहारा साठी ताट पेला आणि चमचा वाटप केले गेले यात 210 मुले लाभार्थी होती. या कार्यक्रमाचे आयोजन गोवेली शासकीय रुग्णालयाच्या नवीन इमारतीत केले गेले. याप्रसंगी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन रोटरी क्लब अध्यक्ष योगेश कल्हापुरे, महेश टीबे, अवधूत शेटे, संजय माचवे, राजेंद्र नेवे , सुनिल शर्मा या रोटरियन सह अपूर्वा शेटे यांनी काम केले. या कार्यक्रम प्रसंगी गोवेली शासकीय रुग्णालय प्रमुख डॉ दीपलक्ष्मी मेश्राम, उषा लांडगे, प्रीती गुडे, अंगणवाडी सेविका तसेच लाभार्थी मुले आदी मान्यवर उपस्थित होते.

## उद्धव ठाकरेंचे निम्मे नगरसेवक शिंदे सेनेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** शिवसेना पक्षाची दोन शकले झाल्यापासून एकेक करीत सुमारे पन्नास टक्के माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. महापालिकेची निवडणूक लवकरच होण्याची शक्यता असल्यामुळे माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थता वाढत चालली आहे. दुसरीकडे ठाकरेंनी उरलेल्या माजी नगरसेवकांची एकही बैठक गेल्या वर्षभरात बोलवली नसल्यामुळे ते देखील नाराज आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका चार महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकांची तयारीही प्रशासकीय पातळीवर सुरू झाली आहे.

## दोन वर्षे रखडलेल्या रस्त्यासाठी डोंबिवलीत निषेध आंदोलन

### आमदार रविंद्र चव्हाणांकडून आंदोलनाची दखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील गरिबाचा वाडा येथील श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोल नगरी पर्यंतचा रस्त्याचे सिमेंट काँक्रीटंट करण्याचे काम गेली दोन वर्षे रखडले आहे. पावसाळा तोंडावर आला तरी काम ठप्प झाले आहे.केडीएमसी आणि एम एम आर डी ए प्रशासनाच्या कासव छाप गतीच्या कारभाराच्या निषेधार्थ गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीच्या वतीने रविवारी डोंबिवलीच्या श्रीधर म्हात्रे चौकात निषेध आंदोलन करण्यात आले.त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

एम एम आर डी ए कडून २०२४ मध्ये २५० मीटर रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचे काम मंजूर झाले आहे .गेल्या वर्षी मे जूनमध्ये या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली .मात्र त्या वेळी अयोग्य नियोजन व अरुंद रस्त्यामुळे तेथे दोन अपघात घडले. त्यामध्ये एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला तर एका रहिवाशी जखमी झाले. अपघात वाढू लागल्याने गरीबाचा वाडा उत्कर्ष समितीने याबाबत आवाज उठल्यानंतर या रस्त्याचे काम पावसाळ्यात थांबविण्यात आले होते. गरीबाचा वाडा श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोल नगरी पर्यंतचा रस्ता खूप अरुंद आहे.या रस्त्यावर एकाच वेळी समोरा समोर दोन मोठी वाहने आली तर वाहतुकीची कोंडी होत असते . गरिबाचा वाडा परिसरात अनेक मोठमोठे गृहनिर्माण कॉम्प्लेक्स उभे राहिले असल्याने लोकवस्ती गेल्या २० ते २५ वर्षात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.लोकवस्ती सोबत वाहनांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे . त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे,पावसाळ्यानंतर या रस्त्याचे रुंदीकरण करून सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणी गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीने महापालिकेकडे केली होती, ती मागणी तत्कालीन महापालिका आयुक्त इंदू राणी जाखड मान्य केली.




पावसाळा संपताच पुन्हा हे काम तातडीने सुरू होणे अपेक्षित होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. प्रशासनाची टोलवाटोलवी आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे गेल्या वर्षभरात त्या रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीने केडीएमसी व एम एम आर डी ए प्रशासनाच्या निषेधार्थ आंदोलनाचा इशारा दिला होता.

वास्तविक या रखडलेल्या रस्त्याचे काम पावसाळ्यानंतर त्वरित सुरू होणे गरजेचे होते. मात्र ते उशिराने सुरू झाले. आत्ता मे महिना अर्धा संपला असून दरम्यानच्या काळात केवळ रस्ता रुंदीकरण व दोन्ही बाजूचे गटार बांधकाम इतकेच काम झाले आहे. रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे झाडे, विद्युत पोल विद्युत दिवे ट्रान्सफॉर्मर अद्याप हलविण्यात आलेले नाहीत. जलवाहिन्या स्थलांतरित केल्या नाहीत.पावसाला तोंडावर आला तरी केडीएमसी व एम एम आर डी ए प्रशासनाची टोलवाटोलवी आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे गेल्या वर्षभरात त्या रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही.त्यामुळे गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीने केडीएमसी व एम एम आर डी ए प्रशासनाच्या निषेधार्थ आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

हाच रस्ता पुढे रिंग रोडला जाऊन मिळणार आहे,त्यामुळे हा रस्ता महत्वाचा आहे.या अरुंद रस्त्यावरून पाण्याचे टँकर, केडीएमसीची आरसी कचरा गाडी, मल्टी एक्सल डंपर ,शालेय बसेस ,रेडी मिक्स सिमेंटची वाहतूक करणाऱ्या गाड्या अशी अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असते .पावसाळ्या पूर्वी रस्त्याचे काम झाले नाही तर आधीच अरुंद असलेल्या या रस्त्यावर पुन्हा तेथे अपघात घडण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी एका महिलेचा डंपर खाली चिरडून मृत्यू झाला होता तर एका ज्येष्ठ नागरिकाचा हात फक्चर झाला होता.या सर्व पार्श्वभूमीवर गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीने रविवारी निषेध आंदोलन करण्याचा निर्णय घेतल्याने आमदार रविंद्र चव्हाण यांनी त्याची दखल घेतली.समितीच्या पदाधिकारी यांना बोलावून घेत त्यांच्याशी चर्चा केली.त्यावेळी समितीने आंदोलन आयत्या वेळी मागे घेतले जाणार नाही.आपण आंदोलनाच्या ठिकाणी या.प्रत्यक्ष रस्त्याची दुरावस्था पाहा,अशी विनंती केली.

त्यानुसार रविवारी सकाळी आंदोलन स्थळी आमदार रविंद्र चव्हाण पोहोचले .त्यांनी केडीएमसी व एम एम आर डी ए अधिकारी यांच्या समवेत रस्त्याची पाहणी केली.त्यानंतर चर्चा करून तांत्रिक अडचणी त्वरित दूर करून रस्त्याच्या कामाला त्वरित सुरूवात करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.तसेच या रस्त्याचे काम रखडल्याने नागरिकांना होणाऱ्या त्रासा बद्दल आमदार चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केली.तसेच यापुढे या कामावर जातीने लक्ष घालून काम लवकर पूर्ण करण्याची ग्वाही दिली. यावेळी गरिबाचा वाडा उत्कर्ष समितीचे अध्यक्ष विवेकानंद धवसे . उपाध्यक्ष युवराज सकपाळ, वैभव केसरकर, विजय राऊत, दीपेश सोनी ,संदीप सालेकर, बारी जयवंत, श्याम बोलके, सुनील पांचाळ,प्रतीक म्हामुणकर,,विकास शिर्के आदी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पडघा आठवडी बाजारात सुकी मच्छी खरेदीसाठी तुंडुब गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पडघा दि. १८ - राजेश दळवी

**भिवंडी:** भिवंडी तालुक्यातील पडघा येथील सुकी मच्छीसाठी प्रसिद्ध असलेल्या रविवारच्या आठवडा बाजारात पावसाळ्यात साठऊन ठेवण्यासाठी अगोठची सुकी मच्छी खरेदीसाठी नागरीकांनी तुंडुब गर्दी केली होती.

पावसाळ्यात मच्छीमारी बंद असल्याने ओली मच्छी बाजारपेठेत उपलब्ध होत नाही त्यामुळे मच्छी खवय्याचें हाल होतात. तसेच पावसाळ्यात शेतीची कामे सुरू असल्याने बाजारात जायला शेतमालकांना वेळ नसल्याने व शेतात काम करणाऱ्या मजुरांना सुकी मच्छीची भाजी अन्नाबरोबर दीली जात असल्याने अनेक शेतमालक सुकी मच्छी पावसाळ्यात साठऊन ठेवतात ही सुकी मच्छी पडघा येथील आठवडा बाजारात मुबलक मिळत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांसह कल्याण, भिवंडी, शहापूर, अंबाडी, वाडा, कसारा, मुरबाड येथील नागरीकांनी अगोठची (पावसाळ्यापूर्वी) सुकी मच्छी साठऊन ठेवण्यासाठी रवीवारच्या आठवडा बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती यावेळी सुकट ४०० ते ५००, बोंबील ५०० ते १२००, मांदेली ३००, ढोमेली २५०, जवळा ३००, वाकटी ४००, दांडी २५० बोंबली २५० , रुपये प्रती कीलो दराने विक्री केली जात होती. तर सर्वाचेंच आवडते व जास्त मागणी असलेले सुकट, बोंबील, जवळा यांचे दर मागच्या वर्षी पेक्षा चांगलेच वधारलेले दिसत होते. तरीदेखील मच्छी खरेदीसाठी नागरीकांनी तुंडुब गर्दी केली होती तर सुकी मच्छी खरेदीसाठी खवय्याची गैरसोय होऊ नये म्हणुन वसई, अर्नाळा, सफाळा, अगासन, भाईंदर, उत्तन, पांचुबंदर, पालघर, येथील कोळी महीला विवीध प्रकारची सुकी मच्छी घेऊन विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या होत्या तर स्थानिक सुकी मच्छी विक्रेते सुध्दा आपली दुकाने लाऊन सज्ज झाले होते.तर पावसाळ्याची चाहूल लागल्याने सुकी मच्छी खरेदीसाठी स्थानीकांसह लांबुन आलेल्या नागरीकांनी चांगलीच गर्दी केली होती.



## "हील युवर माइंडसेट" पुस्तकाचे प्रकाशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण येथील रहिवासी डॉ. दिनेश गुप्ता 'आनंदश्री' लिखित "हील युवर माइंडसेट" या नव्या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक १७ मे रोजी खंडाळा येथील हॉटेल वेल्वेट काउंटी येथे संपन्न झाले. हे प्रकाशन ब्रेनवे रिसर्च फाउंडेशन यांच्या वार्षिक कॉन्क्लेवच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. या पुस्तकाचे प्रकाशन ब्रेनवे रिसर्च फाउंडेशन चे संस्थापक डॉ. अशोक सोनवणे व ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. सुभाषचंद्र पाटील (जानकी क्लिनिक) यांच्याहस्ते करण्यात आले. या विशेष कार्यक्रमाला महाराष्ट्रातून आलेले ७५ मान्यवर समुपदेशक उपस्थित होते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com